**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-३६२/२०२३**

**अपिलार्थी, श्री.विकास बुधा बरतड,**
**मु.तलवाडे, पो.डोळखांब,**
**ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा, मु.तलवाडा,
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय शहापूर,
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.११.२०२२ | ---- | २२.१२.२०२२ | ---- |

अपिलार्थी यांनी दि.१०.२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिल पांडुरंग दांडकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. विलास सोमाजी जाधव, विस्तार अधिकारी, पंचायत समिती शहापूर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(ग्रामपंचायत तलवाडे अंतर्गत पेसा निधीची माहिती मिळणेबाबत.)"*

*"(१. ग्रामपंचायत तलवाडे अंतर्गत ग्रा. पं. प्राप्त एकूण निधी व शासन निर्णय. २. ग्रामपंचायत पेसा कमिटी तपशिल व पासबुक झेरॉक्स. ३. ग्रा. पं. तलवाडे पेसा ग्रामसभा प्रोसिडींग अहवाल व ठराव. ४. पेसा निधी अंतर्गत केलेल्या कामाचा तपशिल. ५. पेसा गाव अंतर्गत स्थापन केलेल्या एकूण गावनिहाय समितीचा तपशिल व भरण्यात आलेल्या एकूण फंडाचा तपशिल व ग्रामसभा ठराव. ६. पेसा मोबिलाईझर यांच्या निवडीचा ग्रामसभा ठराव व अदा केलली मानधन १४ गावाचा तपशिल ७. पेसा अंतर्गत केलेल्या कामाचा तपशिल व कामनिहाय अंदाजपत्रक व ठेकेदार/कंत्राटदार तपशिल. ८. केलेल्या कामनिहाय अदा केलेल्या रक्कमेचा तपशिल.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपावेतो कोणतीच माहिती प्राप्त झालेली नाही. तसेच तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनीदेखील त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावण घेतली नाही किंवा कोणतेही आदेश पारित केले नाहीत.

सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिल पांडुरंग दांडकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिल पांडुरंग दांडकर यांनी पुढील सुनावणीस आयागेकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र

टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तलवाडा यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात शीघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिल पांडुरंग दांडकर, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २१.११.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.२८.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२८.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिल पांडुरंग दांडकर,**
**ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा,**
**मु.तलवाडा, ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ